**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत स्थगित
- दिशा सालियन मृत्यू प्रकरणाच्या चौकशीच्या मुद्द्यावरून आज महाराष्ट्र विधानसभेत गदारोळ
- छत्तीसगढच्या बिजापूर या नक्षलग्रस्त जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या चकमकीत २ नक्षली अतिरेकी ठार, तर सुरक्षा दलाचा एक जवान शहीद
- अमेरिकेत फेडरल रिझर्व्हच्या यंदाच्या दुसऱ्या पत धोरणात व्याजदर सव्वा चार ते साडे चार टक्के या श्रेणीत कायम
- आयसीसी विश्वकरंडक जिंकणाऱ्या भारतीय संघाला क्रिकेट नियामक मंडळातर्फे ५८ कोटी रुपयांचं रोख पारितोषिक जाहीर

**आणि**

- २०२४ हे आतापर्यंतचं सर्वात उष्ण वर्ष राहिल्याचा संयुक्त राष्ट्रांच्या हवामानविषयक संस्थेचा अहवाल

**<><><><><>**

लोकसभेत आज सरकारविरोधी घोषणा छापलेले कपडे घालून विरोधी पक्ष सदस्य सभागृहात आले होते. याला हरकत घेत सभापती ओम बिरला यांनी कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दोन वाजेपर्यंत तहकूब केलं. लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेला विरोध दर्शवणाऱ्या घोषणा छापलेले कपडे परिधान करुन द्रमुकचे सदस्य सभागृहात आले होते. त्यांनी सभागृहाबाहेर जावं असं सभापतींनी सांगितलं, पण तसं न करता विरोधी पक्ष सदस्यांनी

निषेधाच्या घोषणा दिल्या. गदारोळामुळे सभापतींनी कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब केलं.

राज्यसभेत  अध्यक्ष जगदीप धनखड यांनी आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं आणि सर्वपक्षीय खासदारांना आपल्या दालनात चर्चेसाठी बोलावलं.

**<><><><><>**

दिशा सालियन मृत्यू प्रकरणाच्या चौकशीच्या मुद्द्यावरून आज महाराष्ट्र विधानसभेत गदारोळ होऊन कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब झालं. दिशाच्या मृत्यूच्या एसआयटी चौकशीचा अहवाल त्वरित सादर करावा आणि सामूहिक बलात्कार करून तिची हत्या झाल्याचे आरोप तिच्या वडिलांनी काल केले होते. त्यातल्या आरोपींची चौकशी करावी, गरज असेल तर त्यांना अटक करावी अशी मागणी आमदार अमित साटम यांनी केली. या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई करू, असं आश्वासन गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिलं.

या प्रकरणी महाविकास आघाडी सरकारमधल्या मंत्र्यांसह आरोप झालेल्या व्यक्तींना अटक करावी अशी मागणी नितेश राणे आणि शंभूराज देसाई यांनी केली. त्यानंतर सत्ताधारी सदस्यांनी अध्यक्ष समोरच्या जागेत येऊन घोषणाबाजी केल्यानंतर कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब झालं. तत्पूर्वी, दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची सीबीआयकडून सखोल आणि निःपक्षपाती चौकशी व्हावी या मागणीसाठी आज शिवसेनेच्या आमदारांनी विधानभवन परिसरात फलक झळकावत मूक आंदोलन केलं.

**<><><><><>**

सशस्त्र दल वैद्यकीय सेवा आणि राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि न्यूरोसायन्स संस्था यांनी संशोधन, प्रशिक्षण आणि मानसिक आरोग्यासाठी विशेष सहाय्य पुरवण्याच्या उद्देशाने सामंजस्य करार केला आहे. याचा फायदा लष्करी कर्मचारी

आणि त्यांच्या कुटुंबांना होणार आहे. दोन्ही संस्थांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या एका समारंभात हा करार करण्यात आला. लष्करी कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबाच्या मानसिक स्वास्थ्यासाठी आरोग्य सेवेचं बळकटीकरण, वैद्यकीय कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण आणि मानसिक समस्यांचं निराकरण करण्यासाठी कार्यक्रम विकसित करणं हा या संस्थांचा उद्देश आहे.

**<><><><><>**

छत्तीसगढच्या बिजापूर या नक्षलग्रस्त जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या चकमकीत २ नक्षली अतिरेकी ठार झाले. बिजापूर आणि दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमाभागात सुरक्षादलांची संयुक्त शोधमोहिम सुरु असताना ही चकमक झाली. त्यात सुरक्षा दलाचा एक जवानही शहीद झाला. मरण पावलेल्या नक्षल्यांकडून शस्त्रास्त्र आणि स्फोटकं जप्त करण्यात आली आहेत.

**<><><><><>**

नागपुरमधे सोमवारी झालेल्या हिंसाचारात सहभागी असलेल्यांना शोधण्यासाठी पोलिसांनी १८ विशेष पथकं तयार केली असून आतापर्यंत ६९ जणांवर गुन्हे दाखल केल्याचं नागपूरचे पोलिस आयुक्त डॉ रवींद्र कुमार सिंगल यांनी सांगितलं आहे. ते काल वार्ताहरांशी बोलत होते. दंगलींच्या ठिकाणच्या सीसीटीव्ही चित्रफिती तपासल्यावर पोलिसांनी २०० संशयितांची यादी तयार केली असून त्यांची नावं सोमवारी दाखल केलेल्या प्राथमिक माहिती अहवालात नोंदवली आहेत. चित्रफितीत आढळलेल्या इतर एक हजार संशयितांची ओळख पटवण्याचं काम सायबर सेलच्या मदतीने सुरु असल्याचं वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

पारशी नववर्ष दिन जमशेदी नवरोज आज साजरा होत आहे. त्यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. हे नवीन वर्ष सर्वांसाठी सुख, समृद्धी आणि

आरोग्य घेऊन येवो, तसंच या वर्षात सद्भावनेचे बंध अधिक दृढ होवोत अशा शुभेच्छा त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

<><><><><>

अमेरिकेची मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हनं आपला आधारभूत व्याजदर सव्वा चार ते साडे चार टक्के या श्रेणीत कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. फेडरल रिझर्व्हनं २०२५ या वर्षासाठी अमेरिकेचा महागाईचा दर जास्त, तर आर्थिक विकास दर कमी राहील, असा अंदाजही वर्तवला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयात शुल्क वाढीच्या निर्णयानंतर उसळलेल्या जागतिक व्यापार युद्धाच्या पार्श्वभूमीवर फेडरल रिझर्व्हनं २०२५ या वर्षाचं दुसरं पतधोरण जाहीर केलं आहे.

<><><><><>

जग सध्या अस्थिर काळातून प्रवास करत असून, या ठिकाणी भूतकाळात साचलेला तणाव आणि भविष्यातली आव्हानं हे अस्थिरतेची महत्त्वाची कारणं असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं दहाव्या सीआयआय इंडिया-एलएसी परिषदेला संबोधित करत होते. कोविड-१९ आणि त्याच्या दीर्घकालीन परिणामांचा विकसनशील देशांवर प्रभाव पडला असून, शाश्वत विकास उद्दिष्ट पूर्तीला त्याची झळ बसल्याचं ते यावेळी म्हणाले. युक्रेनचा अन्न, इंधन आणि खत सुरक्षेसाठी सुरु असलेला संघर्ष हा अतिरिक्त तणाव असून, केवळ एखाद्या भूप्रदेशात एकवटलेल्या धोक्यांपासून जागतिक अर्थव्यवस्थेवर पडणारी जोखीम दूर करण्याची गरज असल्याचं जयशंकर म्हणाले.

<><><><><>

उत्तराखंड इथल्या यंदाच्या चार धाम यात्रेसाठी आजपासून नोंदणी सुरू होत आहे. यावर्षी, यात्रेसाठीची नोंदणी आधार प्रमाणित केली जाणार असून, नोंदणी

दरम्यान भाविकांना त्यांच्या आधार कार्डचे तपशील द्यावे लागतील. यात्रेकरूंच्या सोयीसाठी एकूण नोंदणीपैकी ६० टक्के नोंदणी ऑनलाईन माध्यमातून होईल, तर ४० टक्के ऑफलाईन असेल. ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी हरिद्वार आणि ऋषिकेश सह यात्रेच्या मार्गावर नोंदणी केंद्रांची संख्या वाढवली जाईल.

<><><><>

आयसीसी विश्वकरंडक जिंकणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाला क्रिकेट नियामक मंडळानं ५८ कोटी रुपयांचं रोख पारितोषिक जाहीर केलं आहे. मंडळाचे अध्यक्ष रॉजर बिन्नी यांनी सांगितलं की आयसीसीचं विजेतेपद लागोपाठ मिळवणं ही विशेष कौतुकाची बाब आहे.

<><><><>

स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये महिला दुहेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत आज भारताची ट्रीसा जॉली आणि तिची जोडीदार गायत्री गोपीचंद यांचा सामना जर्मन जोडीशी होणार आहे. महिला एकेरीत पी.व्ही. सिंधूला काल पहिल्या फेरीत डेन्मार्कच्या जूली डावल जेकबसन हिच्याकडून पराभव पत्करावा लागला.

<><><><>

२०२४ हे आतापर्यंतचं सर्वात उष्ण वर्ष राहिल्याचं संयुक्त राष्ट्रांच्या हवामान शास्त्र संघटनेच्या वार्षिक अहवालात म्हटलं आहे. या वर्षात जागतिक तापमान १८५० ते १९०० या वर्षांमध्ये निर्धारित करण्यात आलेल्या आधार रेषेपेक्षा प्रथमच दीड अंश सेल्सिअसने अधिक नोंदवलं गेल्याचं यात म्हटलं आहे. २०२४ या वर्षात जगभरात नैसर्गिक आपत्तीमुळे सर्वात जास्त लोक विस्थापित झाले असून, सौदी अरेबियासह अनेक ठिकाणी उष्णतेची अभूतपूर्व लाट उसळल्याचं अहवालात म्हटलं आहे. हवामान बदलाचे हे संकेत पृथ्वी ग्रहाची जोखीम वाढवत असल्याचं यात म्हटलं आहे.

<><><><>

पश्चिम बंगालचा गंगेच्या खोऱ्यातला प्रदेश, आसाम आणि मेघालयमध्ये, तसंच छत्तीसगड, ओदिशा, झारखंड, मध्ये आज वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता असून, मध्यप्रदेशचे काही जिल्हे, आणि प्रयागराज सह उत्तरप्रदेशच्या पूर्व भागात पुढले दोन दिवस हलक्या स्वरूपाचा पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. तामिळनाडू, पुडुचेरी, करैकल आणि कर्नाटकच्या अंतर्गत भागात उष्ण आणि दमट हवामान राहील, तर वायव्य भारतात पुढले दोन दिवस कमाल तापमानात टप्प्याटप्प्याने जवळजवळ २ अंश सेल्सिअस वाढ होईल, हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**